# कातरकामाचे नमुने



1. एका कागदाची अर्ध्यात घडी करा. मग वरच्या घडीचा खालचा पदर घडी केलेल्या वरच्या टोकाशी नेऊन परत एक घडी करा. कागदाच्या मागच्या बाजूलाही परत तसेच करा.



2. उजवी बाजू डाव्या बाजूवर येईल अशी परत एक घडी करा.



3. वरच्या बाजूच्या भागाच्या डाव्या बाजूची उजव्या बाजूवर परत एकदा घडी घाला. मागच्या बाजूने परत एकदा असेच करा. तुमच्या कागदाला आता 16 पदर असतील.



4. या लहान चौकोनाच्या चारी बाजूंचे सारख्या आकाराचे लहान चौकोन कापून टाका म्हणजे तुम्हाला कागदाचा जाळीचा नमुना मिळेल.



5. यातील रंगीत भाग कापून टाकलात तर तुम्हाला आणखीच गुंतागुंतीचा जाळीचा नमुना मिळेल.